महा न्यूज & व्ह्यूज

वामाक्षी
BOUTIQUE
Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nirmiti Corner Appartment, Kolhapur.
Mob.- 9175089609

# उभयचरांच्या संवर्धनासाठी शस्त्रक्रियाविरहित अंतःस्त्रावी शास्त्र परिणामकारक : डॉ. नरहरी ग्रामपुरोहित

**कोल्हापूर, ( महा न्यूज ॲण्ड व्ह्यूज) :**

जैवविविधतेचे संरक्षण आणि संवर्धन या दृष्टीने उभयचरांच्या शस्त्रक्रियाविरहित अंतःस्त्रावी शास्त्राचे उपयोजन अत्यंत प्रभावी आणि परिणामकारक ठरणारे आहे, असे प्रतिपादन पुण्याच्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. नरहरी ग्रामपुरोहित यांनी काल (दि. १२) येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित डॉ. आप्पासाहेब तानसेन वरुटे स्मृती व्याख्यानमालेमध्ये ते बोलत होते. कार्यक्रमास डॉ. प्रतापसिंह वरुटे प्रमुख उपस्थित होते.

''उभयचरांच्या संवर्धन शारीरक्रियेत शस्त्रक्रियाविरहित अंतःस्त्रावी शास्त्राचे महत्त्व'' या विषयावर बोलताना डॉ. ग्रामपुरोहित म्हणाले, बेडूक, साप, सरडे यांसारखे उभयचर व सरीसृप प्राणी आज पर्यावरणीय बदल, प्रदूषण, जंगलतोड आणि हवामान बदलामुळे नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. या प्राण्यांच्या संवर्धनासाठी आधुनिक विज्ञानात शस्त्रक्रियाविरहित अंतःस्त्रावी शास्त्र (Non-invasive Endocrinology) ही एक महत्त्वाची आणि उपयुक्त पद्धत ठरत आहे. या पद्धतीत प्राण्यांना



इजा न करता त्यांच्या लघवी, विष्ठा, त्वचा स्राव किंवा केसांमधील संप्रेरकांचे (हार्मोन्सचे) परीक्षण केले जाते. त्यामुळे त्यांच्या आरोग्याची स्थिती, तणावाची पातळी, प्रजननक्षमता आणि पर्यावरणाशी जुळवून घेण्याची क्षमता समजते.

डॉ. ग्रामपुरोहित पुढे म्हणाले, पूर्वी प्राण्यांवर शस्त्रक्रिया करून किंवा रक्तनमुने घेऊन अभ्यास केला जात असे. मात्र या प्रक्रियेमुळे प्राण्यांना तणाव येत असे. शस्त्रक्रियाविरहित पद्धतीमुळे प्राणी सुरक्षित राहतात आणि नैसर्गिक वर्तनात अडथळा येत नाही. या संशोधनामुळे संकटग्रस्त प्रजातींच्या प्रजनन कार्यक्रमांना चालना मिळते, त्यांचे आरोग्य वेळेवर तपासता येते आणि संवर्धनाच्या योजना अधिक परिणामकारकप राबवता येतात. त्यामुळे जैवविविधतेचे संरक्ष करण्यासाठी ही पद्धत भविष्यात अत्यं महत्त्वाची ठरणार असल्याचेही त्यां सांगितले.

यावेळी डॉ. प्रतापसिंह वरुटे यांनी मा कुलगुरू डॉ. आप्पासाहेब वरुटे यांच जीवनकार्याविषयी उपस्थितांना अवगत केले व्याख्यानमालेचे समन्वयक डॉ. माधव भिला यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. साईजल पाटील व वेदिका गुरव यांनी सूत्रसंचाल केले. यावेळी अधिविभागप्रमुख ड एस.आर. यन्कंची यांच्यासह शिक्षव संशोधक विद्यार्थी, पदव्युत्तर विद्यार्थी मोठ संख्येने उपस्थित होते.

पुढारी

# विद्यापीठात मंगळवारपासून आंतरराष्ट्रीय शिक्षण-उद्योग-शासन परिषद

## प्र-कुलगुरू डॉ. जाधव, डॉ. डेळेकर यांची माहिती

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने २० व २१ जानेवारी रोजी आंतरराष्ट्रीय शिक्षण-उद्योग-शासन परिषद २.० चे आयोजन करण्यात आले आहे. परिषदेत तज्ज्ञांची व्याख्याने, महिला उद्योजकांच्या यशोगाथा, स्टार्टअप प्रदर्शन, इनोव्हेशन हॅकेथॉन, पोस्टर स्पर्धा होणार असल्याची माहिती प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, समन्वयक डॉ. सागर डेळेकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

परिषदेच्या उद्‌घाटन समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून मनोरा इन्फो-सोल्यूशन्सच्या संस्थापक अश्विनी दानिगोंड उपस्थित राहणार आहेत. प्रा. कंदलम रामानुजाचार्य (अमेरिका) व डॉ. चंद्रिका कौशिक (दिल्ली) यांची विशेष उपस्थिती असणार आहे. अध्यक्षस्थानी प्रभारी कुलगुरू प्रा. डॉ. सुरेश गोसावी असणार आहेत. परिषदेत शास्त्रज्ञ प्रा. डॉ. मोहम्मद बिन (मलेशिया), डॉ. महेश सूर्यवंशी (ऑस्ट्रेलिया), डॉ. अहमद इलियास बिन (मलेशिया), गिरीश चितळे (चितळे उद्योग समूह), डॉ. विनायक पारळे (जपान), डॉ. देवव्रत हर्षे (डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ), सचिन कुंभोजे (सहसंचालक सीरी), योगेश कुलकर्णी (संचालक, ग्लोबल फायनान्स), आरती भोसले (ग्रीन सोल्युशन पुणे), जयदीप चॅटर्जी (कमिन्स इंडिया पुणे), प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पराग काळकर (पुणे विद्यापीठ), रमेश चव्हाण (किर्लोस्कर ऑईन इंजिन्स), नितीन वाडीकर (चेअरमन, महाराष्ट्र मशिनरी) आपले अनुभव आणि विचार मांडणार आहेत.

परिषदेसाठी देश-विदेशातून सुमारे ३०० पेक्षा अधिक प्रतिनिधी सहभागी होणार आहेत. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, मानव्यशास्त्र विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, डॉ. कल्याणराव गरडकर, डॉ. सुभाष माने, जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर आदी उपस्थित होते.

17 JAN 2020

पुढारी

# विद्यापीठात वि. स. खांडेकर यांची जयंती साजरी

कोल्हापूर : मराठी साहित्यास पहिले भारतीय ज्ञानपीठ परितोषिक मिळवून देणारे साहित्यिक वि. स. खांडेकर यांच्या १२८ व्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठात त्यांना अभिवादन करण्यात आले. वि. स. खांडेकर स्मृती संग्रहालय येथे प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते वि. स. खांडेकर यांच्या अर्धपुतळ्यात पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी संग्रहालयाच्या संचालक डॉ. नीलांबरी जगताप, डॉ. उदयसिंह राजेयादव व स्मृतिसंग्रहालयाचे सहकारी नितीन गंगधर, ऐश्वर्या भुरटे, शीतल कांबळे आदी उपस्थित होते.